# राशिभविष्य - डिसेंबर, २०१८.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** आधीच संतापी, अहंकारी स्वभाव असणाऱ्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या तर अधिकच अस्थिर, चंचल, लहरी झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर कोणाचा धाक किंवा कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो अपमान वाटत असावा, असेही वाटते. त्यामुळे स्वभाव अधिकच संतापी होत असावा, असेही दिसते. या राशीची लहान मुले तर अधिकच व्रात्य व खोडकर झाली असावीत, असेही वाटते. हे सर्व हर्षल या विक्षिप्त ग्रहामुळे घडत असते. पण हाच हर्षल उच्य बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल व उपयुक्त होणार आहे, ही बाब महत्त्वाची आहे. पण या राशीच्या दशम स्थानी असलेला केतू या राशीच्या मंडळींच्या अस्थिर स्वभावामुळे हातचे सोडून नवीन काही करण्याच्या विचारात असण्याची शक्यता वाटते. पण त्यांना सांगावेसे वाटते की त्यांनी तसे काही करू नये. आहे तो व्यवसाय वा नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे, असेच म्हणावे लागेल. कौटुंबिक जीवनात अनिष्ट गोष्टी घडण्याची शक्यता दिसते. गैरसमज, वाद, भांडणे होऊ दिली नाहीत तर खूपच सुखाचे होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे मानसिक त्रास होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या स्वराशीच्या शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. प्रेमप्रकरणे असतील तर ती यशस्वी होतील आणि त्यांचे विवाह होतील. पतिपत्नीपैकी कोणी कलाकार असेल तर कलेत प्रगती होईल व प्रसिद्धी मिळेल. पण या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना मात्र या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, नोकरीत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, हाती घेतलेल्या कामात अडचणी वा अपयश येणे, वरिष्ठांचा विरोध, कामाचा ताण अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या बुध -गुरूमुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग्य आहेत अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासाचे योग येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. जपा. पण हाच मंगळ एखादी मौल्यवान वस्तू देण्याची शक्यताही आहे. पण मंगळासह असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान होणे किंवा आर्थिक घोटाळे होणे, कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " ओम गं गणपतये नम: " मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच "हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. काही मंडळींच्या हातून मोठे कर्तृत्व घडण्याची शक्यता दिसते. पण राहूमुळे काही कारणाने बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर मनाविरुद्ध घटना घडणे, अनारोग्याचा त्रास होणे, हाती घेतलेल्या कामात अडचणी, अडथळे निर्माण होणे, अपयश येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच संतती विषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यताही जाणवते. रवि सह शनि ग्रहही असल्याने वातपित्तकारक प्रकृती असणारांनी आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होईल. काही मंडळींना एखादा मोठा आजार

होणेही संभवते. जपा. प्रथम व षष्ठ  स्थानाचा स्वामी  शुक्र  षष्ठ  स्थानीच  असल्यामुळे व तो दशम या व्यवसाय स्थानाला   पूरक असल्याने यांत्रिक तांत्रिक    व कलात्मक  नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल  व लाभदायक होईल. तसेच  मानसोपचारतज्ञ, औषध विक्रेते आणि  द्रव पदार्थ व्यापार-व्यवसाय असणारांनाही    अनुकुल   व लाभदायक होईल. पण नेपच्यूनमुळे मनस्थिती अस्थिर  होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे  काही मंडळींचे " वरून कीर्तन, आतून तमाशा " असे ढोंगी, धूर्त आचरण होणे संभवते.  गुरु ग्रहामुळे  ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ  होतील.  काही मंडळींचे  नवीन स्नेहसंबंध जुळून येतील.  काहींना अर्थलाभ होईल, तर  काहींना प्रवासाचे योग येतील.  या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे  काही मंडळींना  सांपत्तिक अडचणींना तोंड द्यावे लागेल;  तर काहींना जिवावरच्या  प्रसंगाशी  किंवा  बेअब्रू  होणाऱ्या  घटनेशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. आचरणविषयक दोषामुळे  काहीं जणांशी शत्रुत्व निर्माण होणेही संभवते.  श्रद्धा असेल तर "शिवोपासना" अनुकुल  होईल व मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा.  तसेच  एक माळ " ओम नम:शिवाय"  मंत्राचा  जप  करा.

**(३) मिथुन -** या  राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना  या महिन्याचा  बराच मोठा  काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्यासाठी  सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम  राखता आले पाहिजे.  कारण महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळींना  पोटविकाराचा, काहींना रक्तविकाराचा ,  काहींना मुखदंत विकाराचा  तर काहींना त्वचारोगाचा आजार  त्रस्त  करीतसे दिसते. ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी मनस्थिती सतत शांत व स्वस्थ  राहील  याची काळजी  घ्यावी. अष्टम स्थानी असलेल्या केतुमुळे अपघात भय आहे. त्यामुळे  सतत सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करा.  महिन्याच्या पूर्वार्धात असलेल्या गुरु ग्रहामुळे  फारसे अनारोग्य  होणार नाही.  पण महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त   करीलसे दिसते. तसेच कौटुंबिक जीवनात भांडणतंटे  होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे जीवनसंगिनीला शारीरिक कष्ट व मानसिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. बुध -गुरु-शनि   हे चिकित्सक बौद्धिक ग्रह बौद्धिक कार्यक्षेत्रातील  मंडळींना अनुकुल असल्यामुळे वकिली-सल्लागारी  व्यवसाय असणारांना तसेच शिक्षण क्षेत्रातील मंडळींना आणि  अन्य कोणत्याही चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत  असणारांना संपूर्ण महिन्याचा  काळ  अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी  असलेल्या  स्वराशीतील  शुक्रामुळे  सर्व प्रकारच्या कलाविश्वातील मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक  व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. अध्यात्माची मनापासून आवड असेल तर  उपासनेद्वारे  आध्यात्मिक  प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना  सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे  आर्थिक लाभ होण्याची शक्यता असली  तरी मित्रांमध्ये वाद, भांडणे होणे  संभवते.  तसे घडले तर   मैत्रीत वितुष्ट येऊ शकेल..जपा.  श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना करा. दररोज नियमितपणे स्नानानंतर  " ओम गँ गणपतये  नमः: " मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच " श्रीगणपती अथर्वशीर्षाचे " पठण  करा.

**(४) कर्क  -** या राशीच्या  मंडळींनी  या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होईल.  विशेष करून  वातविकाराचे आजार त्रस्त  करण्याची शक्यता दिसते. तसेच कळत न कळत  होणारे अपमान  असह्य होतील. त्यातून  सूडभावना  प्रज्वलित  होणे संभवते.  या राशीच्या

सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात
वरिष्ठांची अवकृपा सहन करावी लागेलसे दिसते. शिवाय कौटुंबिक जीवनात स्वतः:चे अनारोग्य, मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता, शिवाय प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व अशापैकी कारणांनी अस्वस्थ होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा त्रास होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीचा त्रास होणे संभवते. शिवाय अपघात भय असल्याने हाडमोड होण्याची शक्यताही दिसते. जपा. तसेच जलभय, वीजभय असल्याने जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. त्याचप्रमाणे वीजभय असल्याने विजेवर चालणारी उपकरणे काळजीपूर्वक व सावधानतेने हाताळा. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत राखण्याचा प्रयत्न करावा. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस येथील गुरु ग्रह अनुकुल होईल. सुखस्थानी असलेल्या स्वराशीच्या शुक्र ग्रहामुळे ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. इतरांना मानसिक समाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत परिस्थिती सुधारेल व काही मनोनुकुल घटना घडतील. हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शनि ग्रह वकिलीसारख्या चिकित्सक बोद्धिक क्षेत्रात व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे अस्थिर मनस्थिती राहील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान करून "ओम नमः:शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. तसेच शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वतः:च्या शारीरिक-मानसिक अनारोग्याकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे होईल. त्यात भर म्हणून मुलांपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. विविध कारणांनी कौटुंबिक त्रास होणे संभवते. अपेक्षित कामात दिरंगाई होणे, अपयश येणे, अकारण खर्च वाढणे, प्रिय जनांपैकी कोणाशी फारकत होणे, नातेसंबंधातील कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाणे अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल. पण अशा परिस्थितीत दिलासा देणाऱ्या काही घटना घडण्याची शक्यता आहे. गुरु-बुध-शुक्र. या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व मनाची अस्वस्थता कमी होईल. या राशीच्या काही भाग्यवंतांना भूमिलाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडून अधिक अर्थलाभ होईल. नोकरीत काही जणांना वरिष्ठांचा त्रास होणार असला तरी काही भाग्यवान मंडळींना बढती, मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही मिळण्याची शक्यता आहे. गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख मिळेल तर काहीजणांचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. बुध ग्रहांच्या अनुकुलतेने गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. या राशीच्या सामान्य नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या मंडळींना राहू-केतू ग्रह अनुकुल असून राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते. काही भाग्यवंतांना परदेशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूपासून रक्षण करील. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणू शकेल. केतुमुळे आरोग्य सुधारेल व इतर मनोनुकुल असे काही घडेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले मंगळ -नेपच्यून जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतही वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करतील. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा

येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना सहज प्रगती करणे शक्य होईल. काहींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर गायत्रीसाधना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळ-संध्याकाळ "श्रीगायत्री मंत्राचा कमीत कमी बारा वेळा जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल असे वाटते. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही मनोनुकूल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात अपेक्षित कार्य घडण्याची शक्यता नाही. उलट अपेक्षित गोष्ट घडण्यात दिरंगाई, अडचणी, अडथळे येण्याचीच दाट शक्यता दिसते. शिवाय अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्याचप्रमाणे कौटुंबिक त्रास व दु:खद घटना, मातेस आजार, हितशत्रुभय गृहसौख्यात येणारी बाधा, भावंडाकडून होणारा त्रास अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होऊन गहरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. तसेच राहू-केतू प्रतिकुल असल्याने संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ ग्रह आरोग्यविघातक असून त्याच्यामुळे उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे, इजा होणे, काहींना रक्तविकाराचा त्रास तर काहींना हृदयविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची दाट शक्यता आहे. जपा. पण हा मंगळ औषध विक्रेत्यांना, वैद्यकीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल; तर काहींना चोरी झाल्यामुळे, फसवणूक झाल्यामुळे किंवा आर्थिक नुकसान झाल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. याच षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्यासारखे वाटेल; तर काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी आलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती करणे शक्य होईन. तसेच साहित्यिक लेखन करत असणारांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या स्वराशीतील शुक्रामुळे काहींना धनलाभ होणे संभवते. तसेच कुटुंबातील सदस्यांची त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रगती होत असल्याचे सुखसमाधान लाभेल. वैवाहिक जीवनातील सुखही लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल ग्रह अपघातदर्शक आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या नोकरवर्गात जे अधिकार पदावर असतील त्यांनी वाममार्ग धन मिळविण्याचा विचारही करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. मन:शांतीसाठी दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा'चे पठण करा.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल व भावनाशील झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी नैराश्य येत असावे, असे वाटते. सध्या या राशीच्या मंडळींना आध्यात्मिक उन्नतीसाठी काळ अनुकुल आहे. म्हणून मन:शक्ती वाढविण्यासाठी त्यांनी आध्यात्मिक उपासना करावी. त्यामुळे या महिन्याच्या काळात ज्या काही मनस्तापदायक घटना घडतील त्या सहन करण्याची शक्ती प्राप्त होईल, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या, वित्त हानी, वाढता खर्च, वादविवाद, भांडणे, अशापैकी कारणांनी शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते.

काही मंडळींना  डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास सहान करावा लागेलसे दिसते.  महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने  व काही प्रमाणात बुध  ग्रहही  अनुकुल होणार असल्याने  कुटुंबात शुभ घटना घडतील, अर्थलाभ होईल व अन्य मनोनुकुल  घटना घडतील.  शिवाय नोकरीत  अनपेक्षितपणे काही लाभदायक घटना घडण्याची शक्यता दिसते.  शनि  ग्रहामुळे  या राशीच्या  काही भाग्यवान मंडळींना  मनासारखी नोकरी मिळेल  किंवा  आवडते कार्यक्षेत्र  मिळू शकेल.  पण याच शनीमुळे  एखादी भावंडविषयक चिंता  त्रस्त  करण्याची शक्यता दिसते.  चतुर्थ स्थानी असलेल्या केतूमुळे  घरात कोणाशी पटणार नाही. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल. जपा.  राहू अनुकुल  असल्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना  लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ  ग्रह वैद्यकीय व्यवसाय असणारांना अनुकुल होणार असला  तरी संततिसुखाच्या दृष्टीने  तापदायकच होईल, असे वाटते. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे अनारोग्य अशापैकी घटनांनी  त्रस्त  व्हाल. जपा. काही मंडळींना राहत्या  जागेची समस्या  त्रस्त  करण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी  अकारण दगदग करू नये.  जीवनसाथीचे  लहरी, विक्षिप्त आचरण, पतिपत्नीत होणारे वाद, भांडणे अशापैकी कारणांनी  वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज  अशापैकी कारणांनी  भागीदारीत बाधा येणार  नाही, याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्री हनुमान उपासना मन:शक्ती देईल.  दररोज नियमितपणे “ ओम  नम: शिवाय” ममंत्राचा एक माळ  जप करा. तसेच” हनुमानचलीसा “ स्तोत्राचे  पठण  करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या  मंडळींना  शनि  ग्रहाची साडेसाती असल्यामुळे  व वृश्चिक राशीचा  स्वामी मंगळ  आणि  शनि हे  पक्के शत्रुग्रह असल्यामुळे  या राशीच्या मंडळींना  शनि  ग्रहाच्या साडेसातीचा अधिक  त्रास भोगावा लागतो.  म्हणून या  राशीच्या मंडळींनी आपल्या संतापी व अहंकारी  स्वभावावर नियंत्रण  ठेवावे, मनावर संयम ठेवावा,  मत व्यक्त करू नये, केवळ समोरच्याचे ऐकून घ्यावे व शांत राहावे. असे आचरण केलेत तरच प्रतिकुल  काळ  व परिस्थितीत  टिकाव धरू शकाल. केवळ  गुरु-शुक्र ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने  मधून मधून  मनोनुकूल घटना  घडतील व दिलासा मिळेल.  या संपूर्ण  महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींनी  शारीरिक-मानसिक अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. घरीदारी  सतत मनस्ताप देणाऱ्या  घटना घडण्याची शक्यता आहे. शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे आजार त्रस्त  करतील. विशेष करून डोळ्याचे दुखणे होणे संभवते.  संतापी स्वभावामुळे रक्तदाब  वाढण्याची दाट  शक्यता आहे. जपा. काही मंडळींना हृदयविकार  होणेही संभवते. परिस्थितीचा किंवा आपल्या कार्यक्षेत्रातील  समस्यांचा  फार विचार करू नका.  अति विचारामुळे डोकेदुखी  किंवा मेंदुविकार  बळावण्याची दाट  शक्यता दिसते. जपा.  काही जणांना  वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त  करील, तर काहींना अनपेक्षितपणे निर्माण होणारा  आवश्यक खर्च  कसा करावयाचा याची चिंता त्रस्त  करील.  चंचल अस्थिर मनस्थिती झाल्यास काही जणांना  कुसंगतीची  बाधा होणेही संभवते. क्वचित कोणाच्या मनाचा कल गुन्हेगारीकडे  जाणेही शक्य दिसते. जपा.  शिवाय हातून मित्रद्रोह होणेही संभवते. या राशीच्या  सर्व प्रकारच्या  नोकरदार मंडळींना घरी कौटुंबिक जीवनात व  नोकरीचे ठिकाणी सतत मनस्ताप देणाऱ्या  घटनाना व भांडणतंटयाना  सामोरे जावे लागेल. केवळ शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना  व अन्य बौध्दिक  संशोधन,  व लेखन असे कार्यक्षेत्र असणारांना गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने  प्रगती करणे शक्य होईल.  मात्र त्यासाठी  शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहुजे. तरच वैवाहिक जीवनातील सुखही मिळू शकेल.  काही मंडळींना गलितगात्र असा थकवा  येण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना  व श्रीहनुमान उपासना  मन:शांती  देईल.

दररोज नियमितपणे  स्नान झाल्यावर “ओम गं  गणपतये नम: “ मंत्राचा  कमीत कमी  २१ वेळा जप करा. तसेच “ हनुमानचलीसा” स्तोत्राचे पठण  करा.

**(९) धनु -** या  राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना  या महिन्याचा संपूर्ण  काळ  प्रतिकुल  असल्याचाच अनुभव येईल. रवि -शनि-बुध  हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल  असून  गुरु व केतू  काही  प्रमाणात प्रतिकुल होतील. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना  तर घरी  व नोकरीचे ठिकाणी  काही ना काही कारणाने असह्य  मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. हाती घेतलेल्या कामात अडचणी , अडथळे येणे, त्यामुळे पराभव झाल्याची रुखरुख  लागून  नैराश्य येणे संभवते.  असे घडले तर मनस्थिती अस्वस्थ  राहील  व गहरे नैराश्य येईल.  त्याचा शरीरिक  आरोग्यावरही परिणाम होणे शक्य आहे.  काही मंडळींना  अतिशय थकल्यासारखे  वाटेल, तर काहींना रक्तदाब वाढल्याचा त्रास होईल. हृदयविकार असणारांनी मनावर ताबा ठेवून  मनःस्थिती  शांत ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. अशा परिस्थितीत अध्यात्मासाठी अनुकुल  असलेल्या गुरु-नेपच्यून  ग्रहांची  मदत घेणे जरूरीचे होईल. ते दोन्ही ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल  आहेत. आध्यात्मिक उपासनेत  काळ व्यतीत केलात तर मनावरचा ताण खूप कमी होईल. कुसंगतीची बाधा होऊ  नये म्हणून  शक्य असेल तर सामाजिक कार्यात भाग घ्या.  त्यासाठीही काळ  अनुकुल आहे. मंगळ  ग्रह अनुकुल  असल्याने  काही जणांची हिंमत  व महत्त्वाकांक्षा  वाढेल व कर्तबगारी सिद्ध होईल.  पण  छोटी मोठी  इजा  होणे संभवते. त्यामुळे सतत सावधानतेने आचारण करा.  या  नेपच्यूनमुळे काही मंडळींना  जलप्रवासाचे  तर काहींना  परदेशगमनाचे योग  संभवतात. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षलमुळे  बौद्धिक कार्यक्षेत्र  असणारांना अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल, कलाक्षेत्रातील मंडळींनाही  कलेत प्रगती करणे शक्य होईल. प्रेमप्रकरणे असतील त्यांनी स्वतः: पुढाकार  घेतल्यास कार्यसिद्धी होईल.  या राशीच्या एखाद्या भाग्यवान व्यक्तीला अंतर्ज्ञान  प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहुमुळे  ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहे अशापैकी  काहींना अचानक धनलाभ  किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. लाभस्थानी स्वतः:च्या राशीत असलेला शुक्र ग्रह सर्व प्रकारचे सुखसमाधान देईल.  श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची  उपासना करा.  दररोज  नियमितपणे “ बावन्न श्लोकी  गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या  मंडळींची  वर्तमान मनस्थिती  अतिशय अस्वस्थ, बेचैन अशी झाली असण्याची शक्यता  वाटते. त्यामुळे ही मंडळी सतत काही ना काही तक्रारी करत  असली पाहिजेत. तसेच कोणाशी पटत नसावे, राहत्या जागेची समस्या त्रस्त  करत असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत  सुखसमाधान  कसे लाभणार ?  अशा परिस्थितीत  विविध तऱ्हेने  आर्थिक चिंता अधिकच अस्वस्थ करत असण्याची शक्यता वाटते.  त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून  उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. घसा, मान, दाढा  दुखणे, डोळ्यातील   खुपऱ्या   टोचणे, मनस्थिती अति कोमल झाली असेल तर लगेच गहरे नैराश्य  येण्याची  शक्यता आहे. जपा. अपघात भय असल्याने  विचाराच्या तंद्रीत वाहने चालवू नका.  वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलू नका. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल  होणार आहे. म्हणून  त्यांनी  जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून  घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी रवि -शनि  हे शतृ ग्रह  एकत्र येणार असल्याने संकट परंपरा निर्माण होण्याची शक्यता वाटते. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी  येणे,  कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे  स्थलांतर

झाल्यास मन अस्वस्थ होणे, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, काहींना कोर्ट प्रकरणाचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे संभवते. अशा प्रतिकुल परिस्थितीतही बुध -गुरु या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही मंडळींना वाहनसुख मिळेल तर काहींना धनलाभ होईल. काहींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील तर काहींना विवाहयोग येणे संभवते. काहींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काहींच्या मनात कपटी विचार निर्माण होतील. वाम मार्ग धन मिळविण्याची चटक लागली असलेल्यानी मनावर ताबा ठेवून अशा धनाच्या मागे लागू नये. होत्याचे नव्हते होण्याची दाट शक्यता आहे. कलाक्षेत्रातील मंडळींना काळ काही प्रमाणात अनुकुल होईल; पण इतर व्यावसायिकांना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. श्रद्धा असेल तर "शिवोपासना" व " श्रीहनुमान उपासना " मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "ओम नमः: शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. तसेच 'हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी असे वाटते. तसेच स्वभाव अतिशय लहरी झाला असावा, असेही दिसते. खरोखरच तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत मंगळ ग्रहाच्या हट्टी व मानापमान फार असलेल्या स्वभावामुळे तर असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल व त्यामुळे मानसिक आरोग्याबरोबरच शारीरिक आरोग्यही बिघडत असावे, असेही वाटते. पण एकूण ग्रहस्थिती फारशी प्रतिकुल नसल्यामुळे गंभीर असे काही घडेलसे वाटत नाही. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता दिसते. नोकरीत मनोकामना पूर्ण होण्याची शक्यता आहे. असलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली जाईल. वरिष्ठ खूष होतील. काही मंडळींना बढती, काहींना पगारवाढ, काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. मोठ्या अधिकारी मंडळींशी ओळख झाल्यामुळेही लाभदायक घटना घडू शकतील. या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि ग्रह स्वतः:च्या मालकीच्या स्थानी असल्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तर तो लाभदायकच होईल. शिवाय हितशत्रूंपासून बचाव होईल. केवळ त्याच्यामुळे संततिविषयक सुखात थोडी बाधा येणे संभवते. इतर जाति धर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. पण या राहूमुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. शिवाय विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना हा हर्षल प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या बुध -गुरु ग्रहांमुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर "श्रीशिवोपासना " व श्री हनुमान उपासना" अनुकुल व लाभदायक होईल. दररोज नियमितपणे स्नान करून "ओम नम: शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा. तसेच "हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा,

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. कारण सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय अस्थिर, चंचल आणि मानसिक व्यग्रतेत अडकलेली असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे डोक्यात विचारांची खळबळ चालू असावी

असे वाटते. तसे असेल तर सतत अविचाराचे  विचित्र आचरण होत असण्याची शक्यता दिसते. कोणी काही विचारले तर आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचीही पर्वा केली जात नसेल. ही मंडळी सतत कसल्या तरी चिंतेत असल्याने त्यांना गहरे नैराश्य आले असण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या व्ययस्थानी शत्रू राशीत असलेल्या मंगळ ग्रहामुळे सतत भांडणे होणे, अविचाराने खर्च होणे, कधी मानहानीचे प्रसंग निर्माण होणे, नोकरीत किंवा व्यापार-व्यवसायात स्त्री-वर्गाकडून त्रास होणे अशापैकी घटना घडत असण्याची शक्यता दिसते. असे घडत असेल तर त्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होण्याची शक्यता जाणवते. म्हणून या राशीच्या मंडळींनी मनावर ताबा ठेवून व जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण करावे,असे सांगावेसे वाटते. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल व शारीरिक आरोग्यही फारसे बिघडणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींनी सहनशील बनून व मनावर संयम ठेवून आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात होणाऱ्या अनुकुल काळाचा पुरेपूर लाभ उठवणे शक्य होईल व स्वस्थता लाभेल. विशेष करून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू दलाली,कमिशनवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. लाभस्थानी असलेला केतूही अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या स्वराशीतील शुक्र ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत योग् आहे अशापैकी काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होण्याची शक्यता आहे. पण या राशीच्या वयोवृद्ध मंडळींना तो प्रतिकुल होईल. जपा. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होईल. सद्गुणांची वाढ होईल. प्रगतीच्या नव्या संधी प्राप्त होतील. शिवाय प्रवासाचे योगही संभवतात. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच “हनुमानचालीसा “ स्तोत्राचे दररोज पठण करा.

=====00000o00000=====